RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ६, अंक ७७] शनिवार, ऑगस्ट २९, २०२०/भाद्रपद ७, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १९६

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ ऑगस्ट २०२०

### आदेश

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०२०/प्र.क्र.१३६/म-१(धोरण).—महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा उल्लेख “उक्त अधिनियम” असा करण्यात आला आहे) च्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत काढलेल्या शासन आदेश, महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक-२०२०/प्र.क्र.१३६/म-१(धोरण), दिनांक २८ ऑगस्ट २०२०चे अधिक्रमण करून, लोकहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची महाराष्ट्र शासनाची खात्री पटल्यामुळे, महाराष्ट्र शासन, याद्वारे, कोणत्याही स्थावर मिळकतीबाबतच्या अभिहस्तांतरणपत्र किंवा विक्रीकरारपत्राच्या दस्तऐवजावर उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-१ च्या अनुच्छेद २५ च्या खंड(बी) अन्वये अन्यथा आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क, दिनांक १ सप्टेंबर २०२० पासून सुरू होणाऱ्या आणि दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजी संपणाऱ्या कालावधीकरिता मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात तीन टक्केने आणि उर्वरित महाराष्ट्र राज्यात दोन टक्केने तर, दिनांक १ जानेवारी २०२१ पासून सुरू होणाऱ्या आणि दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी संपणाऱ्या कालावधीकरिता मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात दोन टक्केने आणि उर्वरित महाराष्ट्र राज्यात दिड टक्केने कमी करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार व. जावळे,**

शासनाचे कार्यासन अधिकारी

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Madam Cama Road, Hutatma Raiguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 29th August 2020.

*ORDER*

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2020/CR.No.136/ M-1(Policy).—In exercise of the powers conferred by clause (a) of Section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (herein after referred to as 'the said Act'), and in supersession of the Government Order, Revenue and Forests Department, No.Mudrank-2020/CR.No.136/ M-1(Policy), dated the 28th August 2020, issued in this behalf, the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby reduces the stamp duty by Three per cent. in Mumbai District and Mumbai Sub-Urban District and by Two per cent. in Rest of the State of Maharashtra for the period starting from 1st of September 2020 and ending on 31st of December 2020 and by Two per cent. in Mumbai District and Mumbai Sub-Urban District and by One and half per cent. in Rest of the State of Maharashtra, for the period starting from 1st of January 2021 and ending on 31st of March 2021, as otherwise chargeable under clause (b) of Article 25 of Schedule-I appended to the Said Act, on the instrument of Conveyance or Agreement to sell of any immovable property.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRITAMKUMAR V. JAWALE,
Desk Officer to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.